सोलापूर महानगरपालिकच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५२२ ठ. क्र. ३२८
दि. १९/३/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



शहर सोलापूर रेल्वे स्टेशन ते टिकेकरवाडी पर्यंत गरिबी हटाव झोपडपट्टी नं. १ व २ लगत पुढे रेवणसिध्देश्वर झोपडपट्टी /कल्याण नगर येथील बंद पडलेले मिटरगेज व त्या लगतच्या जागेतील अतिक्रमणे काढणेबाबत रेल्वे प्रशासनाकडून कारवाई चालू होणार आहे. मा. ज्युडीसियल न्यायालयामध्ये झोपडपट्टी वासियाकडून दावा दाखल केला असता, रेल्वेच्या बाजूने निकाल दिलेला आहे. पुढे झोपडपट्टी वासियांच्यावतीने जिल्हा न्यायालयामध्ये या निर्णयाविरुध्द अपील केलेले आहे. वास्तविक पाहता सदर ठिकाणी साधारणपणे २० ते २५ वर्षापासून नागरिक राहत आहेत. रेल्वे प्रशासनाच्या कारवाईमुळे सदर ठिक्‍ाणचे साधारणपणे दोन हजारपेक्षा जास्त लोक बेघर होणार आहेत. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. याकरिता सोलापूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील झोपडपट्टी पुनर्वसन व बेघरांकरिता घरे या करिता आरक्षीत जागा संपादन करणे व याठिकाणी सदर लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता सन २०१५-१६ च्या अंदापजपत्रकामध्ये रक्कम रुपये २,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी) इतकी तरतूद देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५२९ ठ. क्र. ३२५
दि. १९/३/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दलीतमित्र लक्ष्मणराव नरसु आबुटे हे १९५२ ते १९६२ या काळात नगरपालिकेचे प्रथम नगरसेवक होते. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीचे खंदे समर्थक होते. डॉ.बाबासाहेबांचा पुतळा सोलापूर महानगरपालिके समोर बसविला जावा म्हणून त्यांनी उपोषण केले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड, बॅरिस्टर खोब्रागडे, भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या सोबत त्यांनी काम केले. त्यानंतर १९७८ च्या काळात काँग्रेसमध्ये प्रवेश केला व तेंव्हापासून ते काँग्रेसपक्षाशी एकनिष्ठ राहून सामाजिक व राजकीय कार्य केले आहेत. स्व.लक्ष्मणराव आबुटे हे पैलवान होते. पुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंतीचा उत्सव सोलापूरामध्ये त्यांनी त्यांच्या सहका-याच्या मदतीने सुरु केला. त्यामध्ये सर्वधर्मियाना सामावून घेतले.

त्यांचे वरील सामाजिक व राजकीय कार्य लक्षात घेऊन सम्राट चौक ( कर्मवीर भाऊ राव पाटील पुतळा ) ते रुपा भवानी चौक या मार्गास " स्व.दलीतमित्र लक्ष्मणराव नरसु आबुटे मार्ग " असे नाव देण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५१८ ठ. क्र. ३२६
दि. १९/३/१५ .....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



मा.म.न.पा. सर्वसाधारण सभा विषय क्र. २४९ मा.म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाचे कामकाज त्याची रुपरेषा, कामकाजाचे नियम व नियमावली तसेच म.न.पा.चे नियंत्रण इत्यादी बाबत मा.म.न.पा.ठराव क्र. १६६, दिनांक २०-११-२०१४ अन्वये याबाबत आवश्यक तो निर्णय घेणेकामी समिती गठीत करण्यांत आलेली असून सदर समितीची सभा दिनांक २७-२-२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजता कौन्सील हॉल येथील समिती सभागृहात घेण्यात आली असून, मा. संजय च.. हेमगड्डी, सभागृहनेता व उपसमिती कन्वेअर यांनी दिनांक १६-३-२०१५ ने दिलेल्या अहवालावर मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव आलेल्या निवेदनास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर अहवालामध्ये नमूद प्रमाणे कार्यवाही ठेवणेसही मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका